OPPO R9X PRO CAMERA

# कार्यालय पोलीस अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद

## टोल फ्री क्रमांक - 1064

:: प्रेस नोट :: दिनांक :- 30.07.2021.

**गावठाण रस्त्याचे कामाचा व स्मशानभुमी बांधकामाचा सरपंचाकडुन चेक घेण्यासाठी व सरपंचाची लाच घेण्याची इच्छा नसतांना १९,०००/- रुपयांची लाच संरपंचाना देतांना कनिष्ठ अभियंता व खासगी इसमास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाचे पथकाने पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | 1. लोकसेवक श्री. देविदास भिकाजी ठोके पाटील वय 56 वर्ष व्यवसाय नोकरी कनिष्ठ अभियंता पंचायत समिती जालना रा. कांचननगर जालना.<br>2. श्री. काशिनाथ सखाराम चव्हाण वय ४२ वर्ष रा. काकडा ता जि जालना ह मु शिवनगर जालना |
| 2 | गुन्हा घडला ता व ठिकाण | :- | दिनांक 30.07.2021 रोजी डी मार्ट मॉलचे पार्कीगमध्ये मंठा रोडवर जालना, जि.जालना येथे |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 19,000/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार हे सरंपच असुन त्यांचे गावाला खासदार फंडातुन जिल्हा परीषद अंतर्गत २५१५ योजनेतुन गावठाण रस्ता व स्मशानभुमी बांधकामासाठी दहा लाख रुपये मंजुर झाले होते, त्यानुसार तक्रारदार यांचे गावामध्ये गावठाण रस्ता व स्मशानभुमी बांधकाम करण्याचे काम काशिनाथ चव्हाण व त्यांचे मित्र यांनी घेतले होते, त्यानुसार त्यांनी सदरचे काम अर्धवट करुन सदर कामाचे एम बी मंजुर झाल्याने ग्रामपंचायतचे खात्यामध्ये ४,७३,०००/- रुपये जमा झाले होते, त्या रक्कमेचा चेक तक्रारदार यांचेकडुन घेण्यासाठी त्यांना ३% प्रमाणे १५००० रुपये व ४००० रुपये कामाचे ऑडीट करण्यासाठी असे एकुण १९,००० रुपये लाच म्हणुन तक्रारदार यांना देत होते, परंतु तक्रारदार यांना लाच घेण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली.

सदर तक्रारीवरून दिनांक 30.07.2021 रोजी लाच देणेबाबतचा सापळा लावला असता वरील आरोपींतांनी तक्रारदार यांना त्यांचे गावाला खासदार फंडातुन जिल्हा परीषद अंतर्गत २५१५ योजनेतुन गावठाण रस्ता व स्मशानभुमी बांधकामासाठीचे मंजुर झालेली एम बी रक्कम ४,७३,०००/- रुपयेचा चेक तक्रारदार यांचेकडुन घेण्यासाठी तक्रारदार यांना ३% प्रमाणे १५००० रुपये व ४००० रुपये कामाचे ऑडीट करण्यासाठी एकुण १९,००० रुपयांची लाच तक्रारदार यांना पंचासमक्ष देत असतांना लाचेच्या रक्कमेसह त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालनाचे पथकाने डी मार्ट मॉलचे प्तार्कीगमध्ये मंठा रोडवर जालना, जि.जालना येथे पकडले.

1. लोकसेवक श्री. देविदास भिकाजी ठोके पाटील वय 56 वर्ष व्यवसाय नोकरी कनिष्ठ अभियंता पंचायत समिती जालना रा. कांचननगर जालना 2. श्री. काशिनाथ सखाराम चव्हाण वय ४२ वर्ष रा. काकडा ता जि जालना ह मु शिवनगर जालना यांचे विरुध्द पोलीस ठाणे तालुका जि.जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालु आहे.

तसेच अॅन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.

पोलीस उप अधिक्षक,<br>
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना.